संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# मतदारांच्या जाहीरनाम्याचे काय?

**लोकसभा** निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचे मतदान पुढच्या एक दोन दिवसामध्ये पार पडेल आणि बरोबर दीड महिन्याने म्हणजेच २९ मे पर्यंत लोकसभा निवडणुकीचे सर्व निकाल जाहीर झाले असतील. देशाचा राज्यकारभार कोणी करायचा याचा मतदारांचा अंतिम कौल स्पष्ट झालेला असेल. गेल्या तीन आठवड्यांपासून प्रमुख राजकीय पक्ष आपणच कसे मतदारांच्या विश्वासाला पात्र आहोत हे भासवण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासाठी जाहिरनामे प्रकाशित केले जात आहेत. लोकांचे लक्ष वेधण्यासाठी या जाहीरनाम्यांना वेगवेगळी नावे दिली जात आहेत. काँग्रेसने प्रकाशित केलेल्या जाहीरनाम्याला न्याय असे संबोधले गेले. तर भारतीय जनता पार्टीने आपल्या जाहीरनाम्याला संकल्पपत्र असे नाव देऊन पुढच्या पाच वर्षात आम्ही काय करू इच्छित आहोत याची जंत्री त्यामध्ये दिली गेली आहे. या जाहीरनाम्यांवर लोकांचा विश्वास नसतो. कारण कोणताच राजकीय पक्ष जाहीरनाम्यापैकी २५ टक्के आश्वासनेसुध्दा पूर्ण करीत नसतो. ही लोकशाहीची फार मोठी शोकांतिकाच म्हणावी लागते. कारण प्रमुख आणि जबाबदार अशा राजकीय पक्षांनी स्वतःच्याच जाहीरनाम्यांचा सन्मान करू नये म्हणजेच त्यातली आश्वासने पाळू नयेत आणि त्यांच्या या बेजबाबदारपणाला जाब विचारण्याची कोणतीच व्यवस्था असू नये ही लोकशाहीची थट्टाच ठरते. खरे तर लोकशाहीला तिच्या सन्मानाची हमी हवी आहे. जी आज राजकीय पक्षांकडून मिळू शकत नाही. केवळ संकल्प आणि आश्वासने देऊन राजकीय पक्षांची पात्रता सिध्द होत नाही. या जाहीरनाम्यांबरोबर गेल्या निवडणुकीत दिलेल्या जाहीरनाम्यापैकी किती टक्के आश्वासने पूर्ण झाली याचा जर लेखाजोखा दिला गेला तरच या नव्या जाहीरनाम्यांना काही अर्थ उरतो. विरोधी पक्ष सत्तेत नसतात. परंतु आपल्या जाहीरनाम्याप्रमाणे त्या मुद्दांचा त्यांनी किती प्रमाणात पाठपुरावा केला. हे त्यांनी आपल्या नव्या जाहीरनाम्यामध्ये मांडणे तितकेच गरजेचे ठरते. सत्ताधारी पक्षाने तर गेल्या जाहीरनाम्यापैकी किमान ८० टक्के कामे पूर्ण केली हे सिध्द करायला हवे. दुर्दैवाने तसे होत नाही. मतांसाठी जाहीरनाम्यांचा सोपस्कार पार पाडला जातो. आश्वासनांच्या नावाने सरळसरळ धुळफेक होते.

### लोकांचा विश्वास नाही

ज्या लोकशाहीसारख्या संविधानाची सन्मान करणारी ही व्यवस्था अधिक परिपक्व केली पाहिजे. म्हणजेच निवडणुकीतून दिली जाणारी आश्वासने, भाषणे, ही केवळ प्रचारापुरती न राहाता त्यातून देशाच्या आणि सर्वसामान्य माणसाच्या विकासाचा विचार प्रकट झाला पाहिजे. एकमेकांवर टीका करणे  किंवा आरोप प्रत्यारोपांसाठी वाटेल तशा भाषेचा प्रयोग करून मतदारांपुढे सवंगतेचे प्रदर्शन करणे टाळले पाहिजे. जाहीरसभांना होणाऱ्या गर्दीपुढे काहीही बोलले तरी चालते. म्हणजेच त्या सभेत दिलेली आश्वासने पाळलीच पाहिजेत असे कोणतेही बंधन आपल्यावर नाही अशी या लोकांची समजूत झालेली असते. भाषणे ऐकायला येणारा मतदार हा काही रिकामटेकडा नसतो. त्याला ठोस आणि निश्चित भूमिका समजून घ्यायची असते. परंतु त्याला गृहित धरले जाते. नको त्या आश्वासनांची खरे तर खोट्या आश्वासनांचा भडीमार करून त्याला संभ्रमित केले जाते. या पार्श्वभूमीवर मतदारांचाही जाहीरनामा प्रकाशित झाला पाहिजे. त्यांच्या मनातील अपेक्षा राजकीय पक्षांपर्यंत पोहचू शकेल अशी व्यवस्था झाली पाहिजे. यासाठी मतदारांनी एकत्र येणे किंवा मिळेल त्या माध्यमातून मतदारांचा जाहीरनामा प्रसारित केला पाहिजे किंवा मांडला गेला पाहिजे. वेळ पडल्यास निवडणूक आयोगाने यासाठी पुढाकार घ्यायला हवा आणि मतदारांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन केले जाईल अशी व्यवस्थाही आकाराला आणली पाहिजे. मतदारांनी मतदान करावे यासाठी निवडणुक आयोग पुढाकार घेतो. परंतु मतदारांनी आपल्या मनातील भावनादेखील व्यक्त कराव्यात किंवा देशाच्या विकासाची त्यांच्या मनातील संकल्पना काय आहे हेदेखील त्यांनी मोकळेपणाने मांडावे. तशा प्रकारची व्यासपीठ किंवा व्यवस्था निवडणुक आयोगाने उपलब्ध करून देणे अधिक योग्य ठरू शकते. म्हणजेच मतदार हा केवळ मतांपुरता नाही किंवा मतांमधूनच त्याचा विचार व्यक्त होईल असेही गृहित धरण्याचे कारण नाही. मतदार म्हणजे एक सर्वंकष विचार आहे. अशी स्वतंत्र प्रतिमा निर्माण होण्याची आवश्यकता आहे.

### अविश्वासाचा खेळ

मतदारांना गौण ठरवून किंवा त्यांच्या अपेक्षांचा विचार न करता आपल्या सोयीचे जाहिरनामे प्रकाशित करीत असतात. आज शिक्षण महाग होत चालले आहे. लाखो रुपये खर्चून घेतलेल्या शिक्षणानंतरही नोकऱ्या मिळत नाहीत. मोठ्या महानगरांमध्ये परवडणारी घरे मिळत नाहीत. तर खेड्यांमध्ये त्यांच्या जागेला किंवा शेतमालालाही भाव मिळत नाही. असा कितीतरी मोठा विरोधाभास पाहायला मिळतो. त्या मूलभूत आणि दैनंदिन समस्या सोडवण्याची आवश्यकता असताना बुलेट ट्रेन किंवा प्रत्येकाला ७२ हजार रुपये रोख रक्कम अशा घोषणांचा पाऊस पाडला जातो. परंतु लोकांना दैनंदिन जीवन सुरक्षित हवे असते. अजूनही छोटी मोठी कामे करून घेण्यासाठी पैसे चारावे लागतात. ट्रॅफिक पोलिसांपासून ते सरकारी कार्यालयातील मोठ्या अधिकाऱ्यांपर्यंत लाचखोरपणा कायम असल्याचेच दिसून येते. मुंबईसारख्या महानगरामध्ये उपनगरी रेल्वे प्रवास म्हणजे मनुष्यत्व या शब्दाचा अपमान ठरतो. प्रचंड गर्दीमध्ये स्वतःला कोंबून घेणारा मुंबईकर नाईलाजाने हे जीवन जगतो. त्याची सुरक्षित प्रवासाची अजूनही हमी दिली जात नाही. या सगळ्या अडचणी आणि समस्या असताना नव्या शतकातील नव्या मतदारांनी आपल्याला मतदान करावे असे आवाहन राजकीय पक्ष करीत असेल तर तो मतदारांचा तितकाच मोठा विश्वासघात ठरतो. जे राजकीय पक्ष मतदारांचा विश्वासही मिळवू शकत नाहीत ते राजकीय पक्ष जाहीरनाम्यांच्या माध्यमातून पुन्हा तोच अविश्वासाचा खेळ खेळत असतात.